# शाब्दिक उदाहरणे : बेरीज–वजाबाकी

## समजून घेऊया

१) रमेशने बाजारातून १५४ मोठ्या वह्या व २२६ लहान वह्या विकत आणल्या, तर त्याने बाजारातून एकूण किती वह्या विकत आणल्या?

| | श | द | ए | |
|---|---|---|---|---|
| | | १ | | |
| + | १ | ५ | ४ | मोठ्या वह्या |
| | २ | २ | ६ | लहान वह्या |
| | ३ | ८ | ० | एकूण वह्या |

**उत्तर : रमेशने एकूण ३८० वह्या आणल्या.**

२) अन्वरने त्याच्याकडील १५० फुलांमधून ४१ फुलांची एक माळ तयार केली, तर आता त्याच्याकडे किती फुले शिल्लक आहेत?

| | श | द | ए | |
|---|---|---|---|---|
| | | ४ | १० | |
| – | १ | ~~५~~ | ~~०~~ | एकूण फुले |
| | | ४ | १ | माळेसाठी वापरलेली फुले |
| | १ | ० | ९ | शिल्लक फुले |

**उत्तर : अन्वरकडे १०९ फुले शिल्लक आहेत.**

## सोडवून पाहूया

१) कुलश्रीकडे दुकानात ११६ पेन्सिल विक्रीसाठी आहेत. तिने अजून २९५ पेन्सिल खरेदी केल्या, आता दुकानात एकूण किती पेन्सिल आहेत?

| | श | द | ए | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| + | १ | १ | ६ | पेन्सिल |
| | २ | ९ | ५ | पेन्सिल |
| | | | | ................ |

उत्तर : ....................................

२) जॉनने दिवाळीसाठी ५०० आकाशकंदील विक्री–साठी आणले. त्यातील १२३ आकाशकंदीलांची विक्री झाली, तर शिल्लक आकाशकंदील किती?

| | श | द | ए | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| – | ५ | ० | ० | एकूण आकाशकंदील |
| | १ | २ | ३ | विक्री झालेले आकाशकंदील |
| | | | | ................ |

उत्तर : ....................................

३) प्रतीकने आपल्या बहिणीसाठी २४५ रुपयांची पुस्तके व १५० रुपयांच्या वह्या विकत घेतल्या, तर त्याने एकूण किती रुपयांची खरेदी केली?

| | श | द | ए | |
|---|---|---|---|---|
| | २ | ४ | ५ | पुस्तकांची किंमत |
| + | १ | ५ | ० | वह्यांची किंमत |
| | | | | एकूण किंमत |

**म्हणजे प्रतीकने आपल्या बहिणीसाठी .......... रुपयांची खरेदी केली.**

४) रीताच्या काकांच्या शेतात ५४२ आंब्याची झाडे आणि ३०७ लिंबाची झाडे आहेत, तर दोन्ही मिळून किती झाडे आहेत?

| | श | द | ए | |
|---|---|---|---|---|
| | | | | .................... |
| + | | | | .................... |
| | | | | एकूण झाडे |

**आंब्याची आणि लिंबाची मिळून .......... झाडे आहेत.**

५) एका गावात कोविड-१९ लसीकरण केंद्रामध्ये पहिल्या दिवशी १३५ व्यक्तींचे आणि दुसऱ्या दिवशी २६३ व्यक्तींचे लसीकरण झाले, तर एकूण किती व्यक्तींचे लसीकरण झाले?

| | श | द | ए | |
|---|---|---|---|---|
| | | | | .................... |
| + | | | | .................... |
| | | | | .................... |

**दोन दिवसांत एकूण .... व्यक्तींचे लसीकरण झाले.**

६) मकरंद यांनी त्यांच्या बागेत ६८ रोपे लावली. त्यातील ५६ रोपे आंब्याची, तर उर्वरित रोपे चिंचेची आहेत, तर त्यांनी चिंचेची किती रोपे लावली?

| | द | ए | |
|---|---|---|---|
| | | | .................... |
| − | | | .................... |
| | | | .................... |

**चिंचेची .......... रोपे लावली.**

## सराव करूया

१) वैशालीने तिच्या शेतात १३३ आंब्याची झाडे लावली. या शेतात यापूर्वी १९८ झाडे होती, तर शेतात आता एकूण किती झाडे आहेत?

२) अफसानाच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील ३६५ मुलांना रंगीत खडू वाटावयाचे होते. १७८ मुलांना रंगीत खडू वाटल्यानंतर तिचे रंगीत खडू संपले, तर अजून किती मुलांना रंगीत खडू वाटायचे राहिले?

३) एका गोदामात ३१६ तांदळाच्या गोण्या होत्या. त्याच गोदामात ५२४ गव्हाच्या गोण्या होत्या, तर त्या गोदामात तांदूळ व गव्हाच्या मिळून एकूण किती गोण्या होत्या?

४) एका महिन्यात कंपनीने लाल व काळ्या रंगाच्या ७६६ मोटरसायकल विकल्या. त्यातील १८९ मोटरसायकल लाल रंगाच्या होत्या, तर काळ्या रंगाच्या किती मोटरसायकल होत्या?

५) लम्पी आजाराच्या पार्श्वभूमीवर एका गावातील २०३ जनावरांपैकी १०५ जनावरांना लसीकरण करण्यात आले, तर अजून किती जनावरांना लस देण्याचे राहिले?